# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/3007

दिनांक :- 26 SEP 2019

प्रति,

प्राचार्य,

शासकीय/अनुदानित/विनाअनुदानीत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था

औरंगाबाद विभाग

**विषय**:-शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या अमंलबजावणीबाबत.

**संदर्भ** :१) या कार्यालयाचे पृ. क्र. विकाऔ/शिक्षण/२०१९/२५१४, दि.०७-०८-२०१९

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/ २०१९/४१५, दि.२३/०८/२०१९

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या योजनासाठी बनविलेल्या महाडीबीटी पोर्टलवर (संकेतस्थळः https://mahadbtit.gov.in ) उच्च व तंत्रशिक्षण आणि अल्पसंख्यांक विकास विभागाच्या तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजना
३. उच्च व्यावसायीक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग-१ वैदयकीय अभ्यासक्रम वगळून)

या विभागांतर्गत येत असलेल्या सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, वरील संदर्भ क्र. १ अन्वये या विभागांतर्गत असलेल्या संस्थेत प्रवेशीत सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून संबधीत योजनेचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज तात्काळ भरुन घेऊन ऑनलाईन मंजूर करणे विभागाकडे पाठविण्याबाबतचे वेळापत्रक देऊन याबाबत कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे. तथापि संस्थेने पाठविलेल्या अर्जाची छाननीची प्रक्रिया अतिशय मंदगतीने असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुसार कळविण्यात येते की, संस्थेमध्ये शिकणा-या सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून संबधित योजनेचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज तात्काळ भरुन घ्यावे व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणा-या अर्जांची छाननी प्रलंबीत न ठेवता निकाली काढावे. तसेच कोणताही पात्र विद्यार्थी लागु असलेल्या संबधित योजनेसाठी नवीन व नुतनीकरणाचे अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता स्वतः संस्थेच्या प्राचार्यांनी घ्यावी. अन्यथा अर्ज न भरण्याच्या कारणास्तव किंवा संस्थांनी प्राप्त अर्ज निकाली न काढल्याच्या कारणास्तव पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील. सदर प्रक्रिया दि.१०-१०-२०१९ पर्यंत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत: १. मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२. या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी